# प्रेस नोट

| | |
|---|---|
| [illegible] नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.दिपक शंकरराव गोरे, वय ४२ वर्षे पद अव्वल कारकुन, उपविभागीय अधिकारी कार्यालय सिंदखेडराजा, ह.मु. चर्चजवळ सिंदखेडराजा जि.बुलडाणा मुळ रा.गणेश पेठ वाशिम जि.वाशिम |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,००,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/– रूपये |
| घटनास्थळ | उपविभागीय अधिकारी कार्यालय सिंदखेडराजा चे पार्कींगमध्ये, |
| घटना तारीख | ०३.०३.२०२१ |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार हे प्रचार व प्रसिध्दी कंत्राटदार असुन त्यांनी सन २०१९ मधील विधानसभा निवडणुक संबधाने ई.व्हि.एम. व व्ही.व्ही. पॅटची जनजागृतीचे कामाचे देयक वरीष्टाकडे मंजुरीकरिता सादर करण्यासाठी तक्रारदार यांना आरोपी लोकसेवक श्री.दिपक शंकरराव गोरे, वय ४२ वर्षे पद अव्वल कारकुन, उपविभागीय अधिकारी कार्यालय सिंदखेडराजा, ह.मु. चर्चजवळ सिंदखेडराजा जि. बुलडाणा मुळ रा.गणेश पेठ वाशिम जि.वाशिम हे ७०,०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार ॲन्टी करप्शन ब्युरो बूलडाणा घटकाकडे नोंदविली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक ०२.०३.२०२१ रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता आरोपी लोकसेवक दिपक शंकरराव गोरे, वय ४२ वर्ष पद अव्वल कारकुन, उपविभागीय अधिकारी कार्यालय सिंदखेडराजा यांनी पंच कमाक १ यांचे समक्ष सन २०१९ मधील विधानसभा निवडणुक संबधाने ई.व्हि.एम. व व्ही.व्ही. पॅटची जनजागृतीचे कामाचे देयक वरीष्टाकडे मंजुरीकरिता सादर करण्यासाठी १,००,००० /– रुपयेची मागणी केल्याने दिनांक ०३.०३.२०२१ रोजी आयोजीत करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान मागणी केलेल्या १,००,००० रुपये लाचेपैकी पहीला हप्ता म्हणुन ५०,०००/– रुपये पचं क्रमांक १ यांचे समक्ष उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा यांचे कार्यालयाचे पार्कीगमध्ये स्विकारले.

आरोपी लोकसेवक श्री.दिपक शंकरराव गोरे, वय ४२ वर्षे पद अव्वल कारकुन, उपविभागीय अधिकारी कार्यालय सिंदखेडराजा, ह.मु. चर्चजवळ सिंदखेडराजा जि.बुलडाणा मुळ रा.गणेश पेठ वाशिम जि. वाशिम यांनी आपले लोकसेवक पदाचा गैरवापर करुन स्वत:साठी पैश्याचे स्वरुपातील अर्थिक लाभ मिळविण्यासाठी लोकसेवक पदाला न शोभनारे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द कलम ७ लाच लुचपत प्रतीबंधक कायदा १९८८ संशोधन २०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही :– १. मा. श्री. विशाल गायकवाड पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती परीक्षेत्र अमरावती.
२. मा. श्री. अरुन सावंत, अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती परीक्षेत्र अमरावती.

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा व सापळा पथकातील स्टाफ नापोका. विलास साखरे, प्रविण बैरागी, विजय मेहेत्रे, पोकाॅ विनोद लोखंडे व चालक पोकाॅ मधुकर रगड, शेख अर्शीद यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा. मोबाईल क्रमांक ८८८८७६८२१८ वर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा यांनी केले आहे

(संजय चौधरी)
पोलीस उपअधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा

Scanned with CamScanner